# सोयाबीनच्या संभाव्य किमती- एप्रिल ते जून २०२३

सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत असतो. अमेरिकन कृषी विभागाच्या, (WASDE, मार्च- २०२३) अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात सोयाबीनचे उत्पादनात मागील वर्षीच्या तुलनेत ८ टक्केनी वाढण्याची शक्यता वर्तविली आहे. तसेच भारतात व महाराष्ट्रात सोयाबीनचे उत्पादनात मागील वर्षीच्या तुलनेत वाढण्याची शक्यता वर्तविली आहे. (कृषि मंत्रालय, भारत सरकार)

मागील तीन महिन्याच्या कालावधीत (जानेवारी ते मार्च २०२३) या दरम्यान लातूर बाजारातील सोयाबीनच्या किमतींत घसरता कल दिसून येतो. जानेवारी २०२३ मध्ये सोयाबिनच्या सरासरी किमती रु. ५३९२ प्रती क्विं. होत्या. त्यामध्ये घट होऊन माहे मार्च २०२३ मध्ये रु. ५१५७ प्रती क्विं. पर्यंत कमी झाल्या आहेत.

सन २०२२-२३ या खरीप हंगामासाठी सोयाबीनची किमान आधारभूत किमत (MSP) रु.४३०० प्रती क्वि. आहे. मागील तीन महिन्यातील लातूर बाजारातील सोयाबीनच्या किंमती व भारतातील APMC बाजारातील आवक खालील तक्त्यात दर्शिवल्या आहेत. सोयाबीनच्या किंमती व आवक मध्ये घट होत आहे.

| महिना | लातूर बाजारातील सरासरी किंमती ( रु/क्विंटल) | भारतातील APMC बाजारातील आवक (लाख टन) |
|---|---|---|
| जानेवारी २०२३ | ५३९२ | ५.३७ |
| फेब्रुवारी २०२३ | ५३१६ | ४.९२ |
| मार्च २०२३ ( २० मार्च अखेर ) | ५१५७ | १.५७ |

मागील काही वर्षातील किमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती विचारात घेता, पुढील तीन महिन्याच्या कालावधीत लातूर बाजारात सोयाबीनच्या सरासरी संभाव्य किमती खालील प्रमाणे राहण्याची शक्यता आहे.

| महिना | संभाव्य सरासरी किंमती ( रु/क्विंटल) |
|---|---|
| एप्रिल - २०२३ | **४८०० ते ५४००** |
| मे - २०२३ | |
| जून - २०२३ | |

सदर संभाव्य किंमत अंदाज हा सोयाबीनच्या FAQ गुणवत्तेसाठी असेल.

